# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंधलेखनाचे काम पूर्ण होतानाच्या अखेरच्या टप्प्यात माझ्या मनात विविध भावना दाटून आल्या आहेत. सुमारे साडेतीन वर्षे मी पुरुषांच्या आत्मचरित्रांचा अभ्यास करताना त्यात हरवून गेले होते. हा अभ्यास करताना अनेकांनी अनेक प्रकारे मला मदत केली. सर्वांच्या सहकार्याशिवाय मी हा प्रबंध पूर्ण करू शकले नसते. त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

पुरुषांच्या आत्मचरित्रांचा हा अभ्यास रूढ अभ्यास नसून स्त्रीवादी दृष्टिकोनातून केलेले पुनर्वाचन आहे. ही संकल्पना मराठीत अजून मूळ धरते आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी चाचपडत पुढे जावे लागले. यासाठी माझ्या मार्गदर्शक डॉ. विद्यागौरी टिळक यांनी केलेल्या मार्गदर्शनाबरोबरच वेळोवेळी दिलेला दिलासा आणि आधार यामुळेच हा प्रबंध पूर्णत्वास जाऊ शकला. त्यांचे औपचारिक आभार मानण्याऐवजी त्यांच्या ऋणात राहणेच मला जास्त आवडेल.

प्रस्तुत प्रबंधाच्या अभ्यासासाठी मला पुढील ग्रंथालयांचे सहकार्य झाले.

१) तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे ग्रंथालय, बारामती.
२) जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ.
३) स्त्री अभ्यास केंद्राचे ग्रंथालय, पुणे विद्यापीठ.
४) शासकीय ग्रंथालय, पुणे.
५) 'आलोचना' चे ग्रंथालय, पुणे.
६) वाडिया ग्रंथालय, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे.
७) पुणे मराठी ग्रंथालय, पुणे.
८) महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कै. वा.गो. आपटे, ग्रंथालय, पुणे.
९) नगर वाचन मंदिर, पुणे.
१०) मुंबई मराठी, ग्रंथ संग्रहालय, दादर.

या ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी ग्रंथ मिळवून देण्यास मोलाचे सहकार्य केले.

याचबरोबर डॉ. द. दि. पुंडे, स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालिका डॉ. विद्युत भागवत, डॉ. शर्मिला रेगे आणि त्यांच्या सहकारी, तसेच डॉ. मंगला वरखेडे, डॉ. प्रभा गणोरकर, पुणे विद्यापीठाच्या संस्कृत प्रगत अध्ययन केंद्राच्या प्रपाठक डॉ.निर्मल कुलकर्णी, मानसशास्त्र विभागाच्या सविता देव, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या डॉ. रेखा देशपांडे, या सर्वांशी झालेल्या चर्चेतून अभ्यासाला गती मिळाली. हे सर्वजण व श्री. संजीव एस्. सोनवणे, श्री. गोविंद उफाडे यांच्याकडून मोलाचे ग्रंथसहाय्यही मिळाले. याबरोबरच पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. मनोहर जाधव यांनीही वेळोवेळी तत्परतेने सहाय्य केले. त्या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

मी काम करत असलेल्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्याकडून कार्यरजा मिळाल्यामुळेच मी हे काम लवकर पूर्ण करू शकले. त्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करणारे महाविद्यालयाचे प्राचार्य आणि कर्मचारी या सर्वांची मी ऋणी आहे.

माझ्या कुटुंबियांचाही या लेखनात महत्त्वाचा वाटा आहे. प्रस्तुत प्रबंधलेखनात अप्रत्यक्षपणे माझ्या सासूबाई सौ. सुनिता नेमाडे, श्वशुर श्री. गणेश नेमाडे, आईवडील सौ. सिंधू सरोदे, श्री. रामदास सरोदे, भाची कु. श्वेता हसरमणी यांनी मदत केली. तसेच माझे पती श्री. श्रीकांत नेमाडे, मुलगा चि. अक्षय नेमाडे यांच्या सहकार्याशिवाय मी हे लेखन करू शकले नसते.

प्रस्तुत प्रबंधाची नेटकी आणि अचूक छपाई करून देण्याचे काम ॐकारमुद्राचे श्री. श्रीकृष्ण पाटणकर आणि सौ. अनुराधा श्री. पाटणकर यांच्याबरोबर सौ. सरोजिनी नवले, सौ. आरती जोशी व श्री. बाशू तोरवी यांनी अत्यंत चिकाटीने केले. यामुळेच प्रस्तुत प्रबंध आकर्षक होऊ शकला.

या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

❑ ❑ ❑